# संक्रातीचा संकल्प

संक्रांत हा शब्द व्यवहारात, एखाद्यावर 'संक्रांत आली' म्हणजेच 'संकटे आली' अशा नकारात्मक अर्थयोजनेसाठी वापरला जातो. वस्तुत: हा शब्द, एका ठिकाणाहून दुसरीकडे गती घेणारी 'चांगली क्रांती', म्हणजेच संक्रांती, असा अर्थ दर्शवितो. मकर संक्रांतीच्या दिवशी सूर्याचे संक्रमण मकर राशीत होते आणि उत्तरायणाला सुरुवात होते. संक्रांतीच्या दिवसापासून पुढील सहा महिन्यांकरिता जणू प्रकाशाचे साम्राज्य पृथ्वीवर सुरू होते. कारण दिवस मोठा आणि रात्र लहान होण्यास याच काळात सुरुवात होते. मनुष्यासह सृष्टीतील प्रत्येक जीवाला पदोपदी ऊर्जेची आवश्यकता असते. किंबहुना ऊर्जेशिवाय कोणतीही प्रगती साध्य करता येत नाही. भौतिक सृष्टीतील ही ऊर्जा सूर्यापासून प्राप्त होते, म्हणूनच सूर्याच्या शुभ संक्रमणाबरोबर समगती साधण्यासाठी सत्कर्मनिर्मितीकरिता हा संक्रमण काळ उपयुक्त आहे असे आपल्या संस्कृतीने फार पूर्वीपासून सांगितले आहे. याचे कारण म्हणजे जसा सृष्टीत अनुकूल बदल होत असतो तसाच अनुकूल बदल मनुष्य जीवनामध्येही या काळात घडू शकतो.

सृष्टीतील अनेक शुभ बदलांची नांदी असणारा हा काळ मनुष्य जीवनातही क्रांतीचे नवे पर्व घेऊन येऊ शकतो. प्रगतीची प्रत्येकाची कल्पना निरनिराळी असते. कोणाला भौतिक जीवनातील प्रगती हीच खरी प्रगती असे वाटू शकेल, तर कोणाला भौतिक प्रगतीतूनही अपूर्णतेची भावना येऊन आध्यात्मिक प्रगती हीच खरी प्रगती असे वाटू शकेल. व्यक्तिगणिक प्रगतीची व्याख्या बदलत असते.

वस्तुत: खरी प्रगती तीच, जेथे कुठलीही गती नाही. गतीचा जन्मच विषमतेतून होतो. मग ही गती ऊर्ध्व दिशेला असू शकेल किंवा अधोदिशेला असू शकेल. जेथे समता प्रस्थापित होते तेथे ही गती खुंटलेली असते. अशी स्थिती प्राप्त होण्यासाठी जी काही क्रांती आयुष्यात घडवावी लागते, तीच समतेकडे नेणारी क्रांती, म्हणजेच संक्रांती होय. मनुष्य जीवनातली ही क्रांती एकाएकी होत नाही व तसे अपेक्षितही नाही. कारण एकाएकी होणारा कोणताही बदल चिरस्थायी टिकण्याची शाश्वती फार कमी असते. असा एकाएकी घडलेला बदल मनुष्याला पचवणेही कठीण असते. एखाद्या अतिशय दरिद्री मनुष्याला अचानक प्रचंड धन मिळाले, सुबत्ता प्राप्त झाली आणि या बदलाला, मिळालेल्या धनाचा विनियोग कोणत्या प्रकारे करावा ज्यामुळे भौतिक आणि आध्यात्मिक धनाची वृद्धी होईल याच्या सुयोग्य ज्ञानासह तो सामोरे जाऊ शकला नाही तर त्या अचानक धनलाभातूनही त्याचे दारिद्र्यच वाढेल. ज्ञानाच्या आणि निश्चित हेतूच्या अभावामुळे हा अचानक झालेला धनलाभ त्या मनुष्याच्या अधोगतीला सुद्धा कारणीभूत होऊ शकेल. हे अचानक बदलाचे दुष्परिणाम असतात.

म्हणूनच हे संक्रमण तिळातिळाने व्हावे लागते. जसा उत्तरायणातील प्रत्येक दिवस तिळातिळाने वाढतो त्याचप्रमाणे जीवनातील ही क्रांती तिळातिळानेच होणे इष्ट असते. अशा तिळातिळाने पण निश्चितरूपाने होणाऱ्या बदलाचा शुभ संदेश एकमेकांना देण्यासाठी आपल्याकडे मकर संक्रांतीदिवशी तीळगुळाची मिठाई वाटण्याचा प्रघात आहे. या क्रांतीसाठी आवश्यक आहे ती अशी क्रांती घडविण्याची तळमळीची इच्छा. दुर्दैवाने सामान्य मनुष्य संक्रातीला एखादा सत्संकल्प करतो आणि दुसऱ्या दिवशी त्याच्या आयुष्यात येते ती किंक्रांत. किंक्रांत म्हणजे संकल्पापाठोपाठ मानवी मनात उद्‌भवणारा विकल्प! संकल्पामागोमाग विकल्प येणे हा जणू नियम असल्याप्रमाणे संक्रांतीमागून किंक्रांत येते. ही किंक्रांत 'अरे, कुठली क्रांती? कसला संकल्प?' अशी भूल पाडत मनुष्याला जीवनातील संभावित सुखाची आमिषे दाखवत, त्याला त्याच्या सत्संकल्पापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत असते. म्हणूनच इच्छेला जोड हवी ती तिळातिळाने होणारी ही क्रांती पूर्णत्वाला नेण्याच्या जिद्दीची. सत्कर्मासाठी पहिल्या दिवशी एक तीळ रुजू करून जीवनात क्रांती घडण्याची अपेक्षा ठेवली तर ती फोल ठरते, कारण तेवढ्या एकाच तिळाच्या अर्पणाने क्रांती साध्य होत नसते. त्याकरिता सत्कर्मांचा रोज एक एक तीळ वाढविला पाहिजे व त्याकरिता आपला देह कणाकणाने झिजविण्याची जिद्दसुद्धा पाहिजे.

संक्रांतीचा संकल्प टिकविण्यासाठी किंक्रांतींच्या विकल्पावर निश्चयपूर्वक मात करणे नितांत आवश्यक ठरते. संकल्पाचा संदेश देण्यासाठी चिमूटभर तीळ वाटले असतील तर किंक्रांतीच्या विकल्पाला नष्ट करण्यासाठी मूठभर तिळाची भाकरीच हवी!

वातावरणात जशा सत्शक्ती कार्यरत असतात तशाच विक्षेप शक्तीसुद्धा असतात. या शक्ती मनुष्याच्या मनात विक्षेप लहरी निर्माण करतात. प्रपंचाच्या अडचणी आहेत त्यापेक्षा मोठ्या करून दाखवतात. तिरप्या प्रकाशात, वस्तूच्या प्रत्यक्ष आकारमानापेक्षा तिच्या सावलीचा आकार मोठा होऊन मनुष्याच्या मनात जसा बागुलबुवा निर्माण होतो तसाच बागुलबुवा या विक्षेप शक्ती निर्माण करतात. मनातील विकल्पांच्या सावल्यांचा नाश करण्याचे सामर्थ्य फक्त सत्याच्या प्रकाशाकडे आहे आणि हा प्रकाश मिळवण्याचा निश्चय संक्रांतीच्या संक्रमण काळात करणे अध्यात्माला अपेक्षित आहे! हा आध्यात्मिक प्रकाश जेव्हा जीवनात पडायला सुरुवात होते तेव्हा तीच क्रांतीची पहाट असते. मकर संक्रांतीच्या उगवत्या सूर्याबरोबर प्रत्येकाच्या जीवनात क्रांतीची पहाट उदीत होऊ दे हाच या दिवसाचा शुभ संदेश!

(वासुदेव वामन बापट गुरुजी ओम सद्‌गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर आणि खोपोली स्थानांवर गुरुपदी विराजमान आहेत. संपर्क
bhende@indiatimes.com)
- बापट गुरुजी



Ads by Guruji




आपला जीवन साथी आपण आपल्या
समाज मधून च शोधून काढा
Exclusive Matrimony Portal for Maharashtrians
marathi matrimony.com
A part of BharatMatrimony.com
Register FREE
Brahmin
Maratha
Kunbi